आर्थिक साक्षरता सप्ताह
5 ते 9 जून 2017

# आपल्याकडे इंटरनेटसह स्मार्ट मोबाईल फोन आहे का?

**आता एकात्मिक प्रदान (यु.पी. आय. ) सेवे द्वारे डिजीटल प्रदाने करा**

या सेवेद्वारा ज्या मोबाईलमध्ये इंटरनेट आहे तेथे पैशाची देवाण-घेवाण करणे सहज शक्य आहे.



**आपण वापरु शकता**
तुमचा मोबाईल नंबर तुमच्या बँक खात्याशी जोडला असेल तर
आणि
तुमच्याकडे एटीम/डेबीट कार्ड असेल तर

या साठी तुम्ही भीम (BHIM) ॲप इतर कोणत्याही बँकेचे किंवा इतर कंपनीचे ॲप वापरुन एकात्मिक प्रदान सेवा (यु.पी.आय.) वापरुन व्यवहार करु शकता. उदाहरणार्थ - आपल्या मोबाईलमध्ये एक वेळ भीम ॲप नोंदणी (रजिस्ट्रेशन) ची पद्धत खाली सोप्या पद्धतीने विशद केली आहे.

## एक वेळ नोंदणी (रजिस्ट्रेशन) पद्धत

1. भीम ॲप आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करुन घ्या
2. ॲप उघडा, एक एस एम एस तुमच्या डिव्हाइस नोंदणीसाठी पाठविला जाईल.
3. एक पासवर्ड तयार करा आणि नंतर आपला लॉगिन केल्यानंतर बँक खाते निवडा
4. तुमचा पेमेंटसाठीचा पत्ता किंवा एकात्मिक प्रदान ओळख तुमचा मोबाईल नंबर @upi (xxxxxxxxxx@upi) असा असेल
5. तुमचा यु.पी.आय. पिन तयार करण्यासाठी खालील गोष्टी नोंदवा
   - तुमच्या एटीएम कार्डाचे शेवटचे सहा अंक,
   - एटीएम कार्डाची मुदत संपणारा महिना व वर्ष
   - तुमच्या मोबाईलवर आत्ता प्राप्त झालेला ओटीपी (OTP)

तुमच्या युपीआय पिन द्वारे तुम्ही केव्हाही सहजरीत्या पैसे पाठवू शकाल मात्र त्यासाठी त्या माणसाचा युपीआय आयडी म्हणजे पेमेंटसाठीचा पत्ता आवश्यक आहे
जर त्याचा युपीआय आयडी म्हणजे पेमेंटसाठीचा पत्ता नसेल तर त्याचाआय एफ एस कोड आणि खाते क्रमांक, हे पर्यायसुद्धा पैसे पाठविण्यासाठी उपलब्ध आहेत



जलद आणि तात्काळ हस्तांतरण चोविस तास सेवा

आर्थिक साक्षरता • समृद्धीचा मार्ग

**UPI**

**वित्तीय समावेशन आणि विकास विभाग**
**भारतीय रिझर्व्ह बँक**
www.rbi.org.in